मुंबई, बुधवार, ४ जुलै २०१८ | वर्ष : ३० अंक : १६१ | पृष्ठे १२ | मूल्य : ४.०० रुपये | ★★ शहर आवृत्ती
संस्थापक संपादक : बाळ ठाकरे
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना

# कामगारांच्या मुलांना मिळणार स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – कामगारांच्या पाल्यांसाठी राज्यात लवकरच स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या केंद्रामध्ये हे वर्ग सुरू होणार आहेत. यात यूपीएससी, एमपीएससीसह बँकिंग, लिपिक, स्टाफ सिलेक्शन अशा महत्त्वाच्या सरळसेवा भरती परीक्षांचा समावेश आहे. कामगारमंत्री संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या निर्देशानुसार ही योजना सुरू करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची २२७ केंद्रे आहेत. या केंद्रामध्ये कामगार कुटुंबीयांसाठी शिवणवर्ग, शिशुमंदिर, वाचनालये, अभ्यासिका असे विविध उपक्रम राबवले जातात. परंतु मंडळाने कौशल्य विकास प्रशिक्षण आणि रोजगारभिमुख योजना राबवण्याकडे अधिक लक्ष द्यावे असे निर्देश कामगारमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार कामगार विभागाचे प्रधान सचिव राजेश कुमार यांच्या मार्गदर्शनानुसार कामगार पाल्यांसाठी स्पर्धा परीक्षा वर्ग सुरू करण्याची योजना तयार करण्यात आली आहे. यासाठी कामगारांच्या पाल्यांनी नजीकच्या केंद्रात जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. केंद्राचे सविस्तर पत्ते www.mlwb.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.